K.T.S.P.Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar

**Department of Economics**

## Class:- S.Y.B.Com. (SEM III)

# Subject:- BUSINESS ECONOMICS ( MACRO )

# व्यवसायिक अर्थशास्त्र

# ( समग्रलक्षी )

**Assi.Prof.Dhanapune S.V.**

# समग्रलक्षी अर्थशास्त्राचा परिचय

# Introduction to Macro Economics

1.1 समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ व व्याख्या

1.2 समग्रलक्षी अर्थशास्त्राचे स्वरूप

1.3 समग समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती

1.4 समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व

1.5 समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा

1.6 समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे

## 1.0 प्रास्ताविक ( Introduction )

अर्थशास्त्र हे एकच शास्त्र असले तरी अर्थशास्त्राचा अभ्यास अंशलक्षी आणि समग्रलक्षी अशा दोन गटात विभागला जातो.समग्रलक्षी अर्थशास्त्र हा शब्द रॅग्नर फ्रिश यांनी सर्वात प्रथम 1933 साली वापरला आणि नंतरच्या काळात म्हणजे 1936 आली जे एम केन्स यांनी "जनरल थिअरी ऑफ एम्पलॉयमेंट इंटरेस्ट ॲन्ड मनी" या ग्रंथात समग्रपणे मांडणी केली. त्यांच्या प्रभावी विश्लेषणातून हे अर्थशास्त्र समग्रलक्षी अर्थशास्त्र म्हणून ओळखले जाऊ लागले. केन्स यांच्या मृत्यूनंतरही समग्रलक्षी अर्थशास्त्र चा मुख्य प्रवाह केन्स प्रणित अर्थशास्त्र म्हणून ओळखले जाऊ लागले.

## समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ :-

या शब्दाची उत्पत्ती Macros या ग्रीक शब्दापासून झालेली आहे Macros म्हणजे मोठा किंवा व्यापक होय.या अर्थशास्त्रांत सूक्ष्म अर्थशास्त्र प्रमाणात सूक्ष्म घटक यांचा बारकाईने अभ्यास न करता अर्थव्यवस्थेतील वेगवेगळ्या अधिक घटकांचा व्यापकपणे अभ्यास केला जातो.उदाहरणार्थ एकूण रोजगार, एकूण उत्पादन, एकूण मौद्रिक धोरण ,राजकोषीय धोरण, एकूण आंतरराष्ट्रीय व्यापार हे समग्रलक्षी अर्थशास्त्राचे अभ्यास विषय आहेत.

अर्थशास्त्रात समग्रलक्षी या संज्ञेचा वापर प्रथम 1933 मध्ये रॅग्नर फ्रिश यांनी केला. परंतु आर्थिक समस्या संबंधित पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोन विचारात घेत या संज्ञेचे मूळ सोळाव्या व सतराव्या शतकातील व्यापारवादात सापडते. त्यांनी आपल्या विचारात संपूर्ण आर्थिक व्यवस्था विचारात घेतली होती. अठराव्या शतकात निसर्गवाद यांनी संपत्तीचे संचालन स्पष्ट करताना त्याचा वापर केला. एकोणिसाव्या शतकातील कार्ल मार्क्स, माल्थस यांनी समग्रलक्षी आर्थिक समस्यांचा विचार केला. वॉलरस, वीकसेल आणि फिशर यांनी समग्रलक्षी विश्लेषणाच्या विकासास हातभार लावला. त्याचबरोबर मार्शल, पिगु, रबर्टसन, हायेक व हॉट रे यांचेही या विश्लेषणाच्या विकासात योगदान आहे. मात्र समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या विकासाचे श्रेय लॉर्ड केन्स यांना दिले जाते. प्रस्तुत प्रकरणातसमग्रलक्षी अर्थशास्त्र चा अर्थ स्वरूप व्याप्ती महत्व व मर्यादा यांची चर्चा केली आहे तसेच समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे सविस्तर स्पष्ट केली आहेत.

## 1.1 समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ व व्याख्या :

समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट होण्यासाठी त्याच्या काही व्याख्या अभ्यासता येतील काही प्रमुख अर्थशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे

### 1) **प्रा. के.ई. बोल्डिंग :-**

"समग्रलक्षी अर्थशास्त्र वैयक्तिक परिमाणाची संबंधित नसून ते अशा परिमाणाच्या समुच्चच्याशी संबंधित असतो त्याचा संबंध वैयक्तिक उत्पन्न असे नाही तर राष्ट्रीय उत्पन्नाची, वैयक्तिक किमतीशी नाही तर किंमत पातळी अशी वैयक्तिक उत्पादनाची नाही तर राष्ट्रीय उत्पादनाची असतो."

"Micro economics deals not with individual quantities as such but with aggregates of these quantities not with individual incomes but with the national income, not with the individual prices but with the price level, not with the individual output but with the national output."

**Prof. K. E. Boulding**

" समग्रलक्षी अर्थशास्त्र हे अर्थशास्त्राच्या त्या भागाचा अभ्यास करते की ज्याचा संबंध आर्थिक प्रणालीतील स्थुल बेरजा आणि सरासरी रकमा यांच्याशी येतो."

**2) ॲक्ले :-**

" अर्थव्यवस्थेतील समग्र उत्पादन साधनसंपत्तीच्या वापराचे प्रमाण राष्ट्रीय उत्पन्नाचे आकारमान आणि सर्वसामान्य किंमतीची पातळी यांसारख्या चरणांशी समग्रलक्षी अर्थशास्त्राचा संबंध येतो"

“ Macro economics deals with Economic affairs ‘ in the large’ it concerns the overall dimesions of economic life”.

**Prof. Ackley**

**3) जे.एल. कलबर्टसन :-**

" उत्पन्न ,रोजगार ,किंमत व पैसा यांचा समावेश समग्रलक्षी आर्थिक सिद्धांतात केला पाहिजे"

**4) प्रा.जे.एल.हॅनसन**

"समग्र अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी महत्त्वाची शाखा आहे की,जी रोजगाराचे प्रमाण, एकूण बचत आणि गुंतवणूक, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमतपातळी,एकूण मागणी व एकूण पुरवठा, एकूण उत्पादन,एकूण उपभोग अशा मोठ्या समस्या संबंधांचा विचार करते."


“Macro economics is that branch of economics which considers the relationship between large aggregates such as the volume of employments, the total amount of saving and investment national income etc.”

**Prof. J.L Hanson**

## समग्रलक्षी अर्थशास्त्राचे स्वरूप :-

समग्रलक्षी अर्थशास्त्र हे उत्पन्न आणि रोजगार सिद्धांत किंवा उत्पन्न विश्लेषण म्हणूनही ओळखले जाते ते बेकारीची समस्या आर्थिक चढउतार चलन वाढ किंवा चलन घट आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक वृद्धी यांच्याशी संबंधित आहे समग्रलक्षी अर्थशास्त्र हा बेकारीचे कारणे आणि रोजगाराचे विविध निर्धारक यांचा अभ्यास होय व्यापाराच्या क्षेत्रात ते एकूण उत्पादन एकूण उत्पन्न आणि समग्र रोजगारावरील गुंतवणुकीच्या परिणामांशी संबंधित आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारात परकीय मदत आणि व्यवहार तोंडातील समस्या समग्रलक्षी विश्लेषणाच्या अभ्यासात येते चलन विषयक भागात ते पैशाच्या एकूण संख्येच्या सर्वसाधारण किंमत पातळीवरील परिणामांचा अभ्यास करते. समग्रलक्षी अर्थशास्त्राची स्वरूप पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.



## 1 समुच्चयात्मक दृष्टिकोन

समग्रलक्षी अर्थशास्त्र वैयक्तिक घटकांचा अभ्यास न करता समुच्चयात्मक आर्थिक वर्तनाचा अभ्यास केला जातो. यात एका व्यक्तीच्या उत्पन्नाचा अभ्यास केला जात नाही तर राष्ट्रीय उत्पन्नाचा अभ्यास केला जातो. एका विशिष्ट वस्तूच्या किमतीचा अभ्यास केला जात नाही तर सर्वसाधारण किंमत पातळी चा अभ्यास केला जातो.

## 2 समुच्चयन

सूक्ष्म अर्थशास्त्र प्रमाणेच समग्रलक्षी अर्थशास्त्र हे किंवा एकत्रीकरणाच्या तत्त्वाशी संबंधित आहे. समग्रलक्षी आर्थिक विश्लेषण समुच्चयन हे अर्थव्यवस्थेच्या मोठ्या भागाचे संबंधित असते. समग्रलक्षी आर्थिक विश्लेषणात एकूण मागणी एकूण पुरवठा आणि एकूण उत्पादन वगैरेचा अभ्यास केला जातो.

## 3 राष्ट्रीय उत्पन्न उत्पादन व रोजगार हा आधार

सूक्ष्म अर्थशास्त्राचा आधार किंमत यंत्रणा आहे मात्र समग्रलक्षी अर्थशास्त्र आधार राष्ट्रीय उत्पन्न उत्पादनाच्या आणि रोजगार असून या बाबी एकूण मागणी व एकूण पुरवठा यांनी निश्चित होतात.

## 4 सर्वसाधारण समतोल विश्लेषण

समग्रलक्षी अर्थशास्त्र हे सर्वसाधारण समतोलाचे विश्लेषण यावर आधारित असून असे विश्लेषण म्हणजे अनेक आर्थिक चलाचा व यांच्यातील संबंधांचा विस्तारित अभ्यास होईल सर्वसाधारण समतोलाचे विश्लेषण हे अंशिक समतोल विश्लेषण याप्रमाणे एका बाजाराचे विश्लेषण करत नाही तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचे विश्लेषण करते.

## 5 गतिशील विश्लेषण

अर्थशास्त्र प्रमाणे समग्रलक्षी अर्थशास्त्र हे स्थितीशील विश्लेषण नाही. समग्रलक्षी अर्थशास्त्र हे गतिशील विश्लेषण आहे. स्थितिशील विश्लेषण हे वास्तवापासून दूर असते तर गतिशील विश्लेषण वास्तवाच्या जवळ जाणारे असते.

## 6 एकूण मागणी आणि पुरवठा

समग्रलक्षी अर्थशास्त्र एकूण मागणी व एकूण पुरवठा यांचा अभ्यास केला जातो. एकूण मागणी म्हणजे अर्थव्यवस्थेतील सर्व उत्पादनासाठी असलेली मागणी होय. तर एकूण पुरवठा म्हणजे सर्व वस्तूंच्या पुरवठ्याची बेरीज होय.


## 7) पैशाचा वापर आवश्यक

सूक्ष्म अर्थशास्त्र वैयक्तिक परिमाणाची बेरीज करताना ती वास्तव परिमाणाच्या स्वरूपात करता येते. मात्र समग्रलक्षी अर्थशास्त्र एकूण मागणी एकूण पुरवठा विचारात घेत असताना पैशातील मुल्ये विचारात घ्यावी लागतात. वास्तव परिमाणे विचारात घेता येत नाही.

## 1.3 समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती

## (Scope of Macro Economics)

समग्रलक्षी अर्थशास्त्र हा संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास होय. समग्रलक्षी अर्थशास्त्राची वैयक्तिक घटकांचा अभ्यास केला जात नाही, तर अशा व्यक्ती घटकांपासून तयार होणाऱ्या समुच्चयाचा अभ्यास केला जातो. यात एका वस्तूचे उत्पादन, एका व्यक्तीचे उत्पन्न, एका वस्तूची किंमत याचा अभ्यास केला जात नाही, तर एकूण उत्पादन, राष्ट्रीय उत्पन्न, सर्वसाधारण किंमत पातळी यांचा अभ्यास केला जातो. समग्रलक्षी अर्थशास्त्राची व्याप्ती किंवा अभ्यास विषय पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.



## 1)राष्ट्रीय उत्पन्न:

राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप आणि त्याची क्षेत्रनिहाय रचना हे समग्रलक्षी विश्लेषणाचे मुलभूत पैलू(aspects) आहेत. राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीतील प्रवृत्ती आणि त्यांची रचना अर्थव्यवस्थेच्या वृद्धीची प्रक्रिया समजून घेण्याचे उपयोगी पडते. अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पन्नाच्या पातळीची निश्चिती, राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप, राष्ट्रीय उत्पन्न व त्यातील अडचणी, राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्राकार प्रवाह वगैरेंचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो.

## 2)सर्वसाधारण किंमत पातळी आणि चलन वाढ

सर्वसाधारण किंमत पातळीत सातत्याने मोठ्या प्रमाणात वाढ होते. तेव्हा चलनवाढ घडून येते. चलनवाढीचे उत्पादन विभाजन व इतर अनेक बाबींवर विपरीत परिणाम होतात. चलनवाढीची कारणे चलनवाढीचे परिणाम, चलनवाढीचे नियंत्रण वगैरेंचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्र केला जातो.

## 3) व्यापार चक्र

आर्थिक व्यवहारात होणारे चढ-उतार म्हणजे व्यापार चक्र होय. बहुतेक सर्व अर्थव्यवस्थांना अर्थव्यवस्थेतील चढ-उतार आणि व्यापार या समस्येचा सामना करावा लागतो .अर्थव्यवस्थेतील चक्रीय हालचालींचा ( तेजी, अपसरण, मंदी आणि पुनर्जीवन ) एकत्रित(aggregate) आर्थिक प्रश्नांच्या आधारे काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक असते. समग्रलक्षी अर्थशास्त्रात व्यापारचक्राच्या अवस्था, व्यापारचक्रची कारणे, व्यापारचक्राचे परिणाम, व्यापार चक्राचे नियंत्रण याविषयी अभ्यास केला जातो.

## 4) आर्थिक वृद्धी

अर्थव्यवस्थेतील लोकांना चांगली राहणीमानाची पातळी मिळण्यासाठी आणि दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता यासारखे समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आर्थिक वृद्धी घडून येणे आवश्यक असते. विशिष्ट काळात वस्तू व सेवांच्या उत्पन्नात वाढ घडून येणे म्हणजे आर्थिक वृद्धी होय. जगातील सर्व देशांची आर्थिक वृद्धि समान प्रमाणात झालेले दिसून येत नाही. आर्थिक वृद्धीचा कारणीभूत ठरणारे घटक, आर्थिक वृद्धी, अडथळा आणणारे घटक, आर्थिक वृद्धीसाठीची धोरणे वगैरेंचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्र केला जातो.


## 5) मंदीयुक्त चलन वाढ

मंदीयुक्त चलनवाढ म्हणजे बेकारीच्या उच्च दराबरोबरच चलन वाढीचा उच्च दर अस्तित्वात असतो अशी स्थिती होय. बेकारीच्या उच्च दर्जाची अस्तित्व म्हणजे राष्ट्रीय उत्पादनाच्या पातळीत घट होईल. मंदी युक्त चलनवाढीच्या स्थितीत एकाच वेळी किमतीच्या बाबतीत तेजी व उत्पादनाच्या बाबतीत मंदी अनुभवास येते. मंदीयुक्त चलन वाढण्याची समस्याही गंभीर स्वरुपाची समस्या आहे. याचे कारण मंदीयुक्त चलनवाढ आटोक्यात आणण्यात परंपरागत चलन विषयक आणि राजकोषीय धोरण फारशी उपयोगी पडत नाही. समग्रलक्षी अर्थशास्त्र मंदीयुक्त चलनवाढीची कारणे आणि ती दूर करण्यासंबंधीच्या उपाययोजनांचा अभ्यास केला जातो.

## 6)व्यवहारतोल आणि विनिमय दर

दिलेल्या कालखंडात देशाच्या उर्वरित जगाबरोबर बरोबरील आर्थिक व्यवहारांची नोंद म्हणजे व्यवहारातून होणा-या आयात-निर्यात वगैरेंमुळे निर्माण होणारे देणे व येणे याची माहिती मिळते. व्यवहारातून तुटीचा किंवा वाढवण्याचा असला तरी त्यामुळे समस्या निर्माण होतात. व्यवहारतोलातील घटक, व्यवहारतोलातील असमतोलाची कारणे, व्यवहारतोलातील

असमतोल दुरुस्त करण्याचे उपाय यांचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्राची केला जातो. व्यवहारतोलातील व्यवहारांवर विनिमयदराचा प्रभाव पडतो.विनिमयदर म्हणजे दोन देशातील चलनाची ज्या दराने देवघेव होते तो दर होय. विनिमयदराचे प्रकार विनिमय दराचे निश्चिती समग्रलक्षी अर्थशास्त्र केला जातो.



अशा प्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्र पातळीवरील अनेक विषयांचा अभ्यास केला जातो. अशा अभ्यास घटकांची चर्चा करताना अनेक सिद्धांत मांडण्यात आले आहेत.

**समग्रलक्षी पातळीवर अभ्यासल्या जाणाऱ्या काही प्रमुख सिद्धांताची माहिती पुढे दिली आहे.**

1) समग्रलक्षी अर्थशास्त्रात उपभोग फलन सिद्धांत व गुंतवणूक फलन सिद्धांत या दोहोंचा समावेश असलेल्या उत्पन्न, उत्पादन व रोजगार सिद्धांतचा अभ्यास केला जातो. व्यापारचक्र विषयक सिद्धांत हाही उत्पन्न उत्पादन व रोजगार विषयक सिद्धांत त्याचाच भाग आहे.

2) चलनवाढ व चलनघट यांचा समावेश असलेल्या किंमत सिद्धांताचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो.

3) उत्पन्न, उत्पादन आणि रोजगार यांच्या दीर्घकालीन वृद्धीशी संबंधित आर्थिक वृद्धीचा सिद्धांत समग्रलक्षी अर्थशास्त्रात अभ्यासला जातो.

4) आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांतचा अभ्यास, चर्चा समग्रलक्षी अर्थशास्त्रात केली जाते.

5) एकूण राष्ट्रीय उत्पन्नावरील वेतन आणि नफा यांच्या तुलनात्मक संबंधित विभाजनाच्या समग्रलक्षी सिद्धांतचा अभ्यास समग्रलक्षी अर्थशास्त्रात केला जातो.

## समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्व

समग्रलक्षी अर्थशास्त्राचा अभ्यास अनेक बाबतीत महत्त्वाचा आहे. आर्थिक विश्लेषणाची एक पद्धती म्हणून समग्रलक्षी अर्थशास्त्र सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

# समग्रलक्षी अर्थशास्त्राचे महत्व

1)अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती

2) आर्थिक धोरणांची आखणी

3) देशाच्या एकूण कामगिरीचे मूल्यमापन

4)चलनविषयक समस्यांचे विश्लेषण

5) सर्वसाधारण बेकारीचा अभ्यास

6)आर्थिक चढ-उतारांचे विश्लेषण

7) आर्थिक वृद्धीचा प्रक्रियेस मदत

8)वैयक्तिक एककांचे वर्तन समजण्यास उपयोगी

9)समग्रलक्षी विरोधाभास स्पष्ट

10)सूक्ष्म अर्थशास्त्र च्या विकासास मदत

11)वैयक्तिक निर्णय प्रक्रियेत सहाय्य

12) व्यवसायिक निर्णयात महत्व

## 1)अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती

अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती समजून घेण्याच्या दृष्टीने समग्रलक्षी अभ्यास आवश्यक आहे. आपले प्रमुख आर्थिक प्रश्न हे अर्थव्यवस्थेतील एकूण उत्पन्न, उत्पादन, रोजगार आणि सर्वसाधारण किंमत पातळीच्या वर्तनाशी संबंधित आहे ही चले संख्याशास्त्र पद्धतीने मोजता येतात. त्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या कार्यावरील परिणामांचे विश्लेषण करता येते. सर्वसाधारण किंमत पातळी ही अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने उपयोगी आहे .

## 2)आर्थिक धोरणांची आखणी

देशाच्या सरकारांना वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक धोरणे आखली असावी लागतात. अल्पविकसित अर्थव्यवस्था अनेक समस्या असल्यामुळे या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी धोरणे आखली जातात. अतिरिक्त लोकसंख्या चलनवाढ, व्यवहार यांसारख्या समस्यांना अल्पविकसित देशांना तोंड द्यावे लागते. समस्या सोडवण्याची जबाबदारी सरकारची असते. सरकारला धोरणाची आखणी करण्याचे बाबतीत समग्रलक्षी अर्थशास्त्राची अतिशय मदत होते.

## 3)देशाच्या एकूण कामगिरीचे मूल्यमापन

देशाच्या एकूण कामगिरीचे मूल्यमापन करण्याच्या बाबतीत समग्रलक्षी अर्थशास्त्र अतिशय महत्त्वाचे आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या आधारे अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचे मूल्यमापन करता येते. राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी ही आर्थिक व्यवहाराच्या पातळीचा अंदाज करण्याच्या दृष्टीने उपयोगी पडते .तसेच ती अर्थव्यवस्थेतील लोकांच्या विविध गटात उत्पन्नाचे विभाजन कसे झाले आहे हे समजून घेण्याच्या दृष्टीनेही उपयोगी पडते.

## 4) चलनविषयक समस्यांचे विश्लेषण

समग्रलक्षी अर्थशास्त्र च्या मदतीने समस्यांचे विश्लेषण करणे व त्या समस्या योग्य प्रकारे समजून घेणे शक्य होते. पैशांच्या मूल्यात वारंवार बदल होत असतील म्हणजे चलनवाढ किंवा चलनघट घडून येत असेल तर त्याचा अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे चलनवाढ नियंत्रित करणे आवश्यक होते.

अर्थव्यवस्थेच्या पातळीवर चलनविषयक राजकोषीय आणि प्रत्यक्ष नियंत्रणाचे उपाय योजून चळवळ किंवा चलनघट नियंत्रित केले जाते.

### 5) सर्वसाधारण बेकारीची समस्या किंवा सर्वसाधारण बेकारीचा अभ्यास

सर्वसाधारण बेकारीचे कारणे, परिणाम व त्या विरोधी उपाययोजनांचा अभ्यास करण्याच्या बाबतीत समग्रलक्षी अर्थशास्त्र विशेष महत्त्वाचे आहे. सर्वसाधारण रोजगार पातळी प्रभावी मागणीवर अवलंबून असते. मागणीच्या कमतरतेमुळे बेकारी निर्माण होते की बेकारी कमी करण्यासाठी एकूण उत्पादन गुंतवणूक एकूण उत्पन्न व एकूण उपभोग यात वाढ करून प्रभावी मागणीत वाढ करता येते. केन्सच्या रोजगार विषयक सिद्धांत यातून या बाबी स्पष्ट झाल्या आहेत.

### 6) आर्थिक चढ-उतारांचे विश्लेषण

जागतिक महामंदीनंतरच्या काळात समग्रलक्षी अर्थशास्त्र हे आर्थिक समस्या सोडवण्याचा दृष्टिकोन म्हणून पुढे आले. आर्थिक चढ-उतारांचे अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टीने ही असतील तर दूर करणे आवश्यक असते. त्यासाठी आर्थिक चढ-उतारांचे कारणे समजून घेऊन त्या विरुद्ध उपाययोजना करण्याची गरज असते. आर्थिक चढ-उतारांचे कारणांची विश्लेषण आणि उपाययोजना सुचवणे याबाबतीत समग्रलक्षी अर्थशास्त्रात महत्वाचे आहे.

### 7) आर्थिक वृद्धीचा प्रक्रियेस मदत

समग्रलक्षी अर्थशास्त्र वृद्धीच्या अर्थशास्त्राचा अभ्यास केला जातो. समग्रलक्षी अर्थशास्त्र आर्थिक वृद्धी ठरवणे, घटक स्पष्ट करणे आणि उत्पादकतेतील वाढ कमी होते याचे स्पष्टीकरण देते. समग्रलक्षी अर्थशास्त्रच्या आधारे साधनसामग्री व अर्थव्यवस्थेची क्षमता यांचे मूल्यमापन केले जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्न, एकूण उत्पादन, एकूण रोजगार यात वाढ करण्यासाठी योजनांची आखणी केली जाते. अशा योजनांची अंमलबजावणी करून आर्थिक विकासाची पातळी वाढली जाते. समग्रलक्षी अर्थशास्त्रात सातत्यपूर्ण आर्थिक वृद्धी कशी प्राप्त करावी याविषयी माहिती उपलब्ध करते.

### 8) वैयक्तिक एककांचे वर्तन समजण्यास उपयोगी

वैयक्तिक एककांचे वर्तन समजून घेण्याच्या दृष्टीने समग्रलक्षी अर्थशास्त्रचा अभ्यास महत्त्वाचा आहे. वैयक्तिक उत्पादनाची मागणी ही अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीवर अवलंबून असते. एकूण मागणीतील कमतरतेच्या कारणांची विश्लेषण केल्याशिवाय वैयक्तिक उत्पादनाच्या किंवा वस्तूच्या मागणीत घट झाली आहे. याची कारणे समजत नाहीत. विशिष्ट व्यवसाय संस्था किंवा उद्योगांचे खर्चात झालेल्या वाढीचा काळ यांचे विश्लेषण संपूर्ण अर्थव्यवस्थेची सरासरी खर्च स्थिती समजल्याशिवाय करणे शक्य होत नाही. अशा प्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्र शिवाय वैयक्तिक घटकांचा अभ्यास शक्य होत नाही .

### 9) समग्रलक्षी विरोधाभास स्पष्ट

वैयक्तिक घटकांच्या बाबतीत विधाने किंवा निष्कर्ष जसेच्या तसे समग्रलक्षी किंवा अर्थव्यवस्थेच्या पातळीवर लागू करता येत नाहीत. मात्र तसे केल्यास विरोधाभासाची स्थिती निर्माण होते. बचतीचा विरोधाभास वेतन कपातीचा विरोधाभास यांसारखे विरोधाभास स्पष्ट होण्यास समग्रलक्षी अर्थशास्त्राची मदत झाली आहे. उदाहरणार्थ एका व्यवसाय संस्थेच्या बाबतीत वेतन कपात करून रोजगारात वाढ करता येते. मात्र संपूर्ण अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात वेतन कपात केल्यास रोजगार वाढण्याऐवजी घटण्याची शक्यता जास्त असते. समग्रलक्षी अर्थशास्त्रच्या अभ्यासामुळे असे विरोधाभास स्पष्ट झाले आहे .

### 10) सूक्ष्म अर्थशास्त्र च्या विकासास मदत

समग्रलक्षी अर्थशास्त्रचा अभ्यास सूक्ष्म अर्थशास्त्रच्या उभारणीसाठी व विकासासाठी उपयोगी व आवश्यक आहे. उदाहरणार्थ घटत्या उपयोगितेचा नियम अनेक लोकांचे अनुभव गोळा करून ते विचारात घेतल्याशिवाय मांडलेला नाही. सुरुवातीचे कुणी घटकांचा अभ्यास केल्याशिवाय सूक्ष्म अर्थशास्त्र नियम मांडता येत नाहीत.

## 11)वैयक्तिक निर्णय प्रक्रियेत सहाय्य

संपूर्ण अर्थव्यवस्थेचे कार्यपद्धती समजल्यास व्यक्तींना आपले निर्णय योग्य प्रकारे घेण्यासाठी मदत होते. समग्रलक्षी अर्थशास्त्राची ज्ञानामुळे व्यक्तीला सरकारच्या आर्थिक धोरणाच्या प्रभावाचा अंदाज करता येतो. सरकारच्या धोरणामुळे होणाऱ्या चलन वाढीचा अंदाज आल्यास त्याचा दुष्परिणाम वाचवण्याच्या दृष्टीने व्यक्तींना निर्णय घेता येतात .

## 12)व्यवसायिक निर्णयात महत्व

निर्णय घेण्याच्या बाबतीत समग्रलक्षी अर्थशास्त्राची ज्ञान उपयोगी पडते. देशातील राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, एकूण मागणी, स्थिती राजकोषीय व चलन विषयक धोरणे चलनवाढीचा दर यांचा व्यवसाय संस्थांवर परिणाम होतो. या घटकांनी एकूण व्यवसायिक पर्यावरण निश्चित होते. त्यांचा व्यवसायिकांच्या निर्णयावर परिणाम होतो. मागणी संबंधित पूर्वअंदाज अर्थव्यवस्थेची अवस्था व तिची वृत्ती ,प्रक्रिया यावर आधारित असतात.

अशाप्रकारे समग्रलक्षी अर्थशास्त्रामुळे अर्थव्यवस्थेच्या कार्याचे ज्ञान होण्यास मदत होते. त्याचबरोबर आर्थिक धोरणांची आखणी व अंमलबजावणी उपयोग होऊन अर्थव्यवस्थेपुढील आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यात मदत होते.

# समग्रलक्षी अर्थशास्त्राच्या मर्यादा

समग्रलक्षी अर्थशास्त्र सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टीने महत्त्वाचे आहे.मात्र या अर्थशास्त्राच्या बाबतीत काही मर्यादा आहेत त्या पुढील प्रमाणे

### 1)समुच्चय एकजिनसी समजणे

समग्रलक्षी विश्लेषणतील प्रमुख दोष हा आहे की समोरच्या अंतर्गतरचना विचारात न घेता समोरचे एकजिनसी असल्याचे मानले जाते. देशातील सरासरी वेतन हे सर्व व्यवसायातील वेतनाची बेरीज करून काढले जाते. परंतु रोजगाराची एकूण संख्या ही सरासरी वेतनावर अवलंबून नसते. तर ती वेतनाच्या सापेक्ष रचनेवर अवलंबून असते.

### 2)समग्रलक्षी चले नेहमीत महत्वाचे नसतात

जी समग्रलक्षी चले आर्थिक व्यवस्थेची रचना करतात ती फार महत्त्वाची नसण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ देशाचे राष्ट्रीय उत्पन्न हे सर्व व्यक्तींच्या उत्पन्नाचे बेरीज असते. काही थोड्या श्रीमंतांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने राष्ट्रीय उत्पन्न वाढणे शक्य असल्याने राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली असता वैयक्तिक उत्पन्नात वाढ झाली आहे. असे म्हणता येत नाही. अशा प्रकारे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झालेली असतात. त्याचे संपूर्ण समाजाच्या दृष्टीने फारसे महत्त्व नसते .

### 3)समग्रलक्षी अर्थशास्त्राचा  सरसकट वापर दिशाभूल करणारा

समग्रलक्षी अर्थशास्त्राचा  वापर जगातील समस्यांचे विश्लेषण करताना केला जाणारा सरसकट वापर दिशाभूल करणारा ठरतो. उदाहरणार्थ अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार साध्य करून तो टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक उपयोजना वैयक्तिक व्यवसाय संस्था आणि उद्योग यांना लागू केल्यास ते संयुक्तिक  ठरत नाही.

### 4)रचनेचा तर्कदोष

समग्रलक्षी आर्थिक विश्लेषणात 'रचनेचा तर्कदोष' दिसून येतो. एकूण किंवा समग्र आर्थिक वर्तन हे वैयक्तिक व्यवहारांची बेरीज असते. मात्र वैयक्तिक घटकांच्या बाबतीत जे खरे असते ते संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या बाबतीत खरे ठरेलच असे नाही. उदा. बचत करणे हा व्यक्तीच्या बाबतीत  गुण  आहे परंतु समाजाच्या बाबतीत दुर्गुण आहे याचे कारण अर्थव्यवस्थेत फार मोठ्या प्रमाणात बचत करण्यात आली तर त्यातून मंदि निर्माण होण्याची शक्यता असते.

### 5) सांखिकीय व संकल्पनात्मक अडचणी

समग्रलक्षी आर्थिक संकल्पनांचे मोजमाप करताना अनेक सांख्यिकीय व संकल्पनात्मक अडचणी निर्माण होतात. या समस्या सूक्ष्म आर्थिक धोरणांचे समर्थन करण्याचे संबंधित असतात. वैयक्तिक एक किंवा घटक सारखेच असतील तर समोरच्याची अडचण निर्माण होत नाही. मात्र असे वैयक्तिक घटक समान असतील तर त्यांचे एका समग्रलक्षी चलत करणे चुकीचे आणि घातक ठरण्याची शक्यता असते.

### 6)वैयक्तिक एककांना महत्त्व नाही

समग्रलक्षी अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेवर प्रभाव पाडणाऱ्या अंशी संबंधित आहे. समग्रलक्षी अर्थशास्त्र वैयक्तिक एककांचे तुलनेत यांच्या गटाला अधिक महत्त्व दिले जाते. ते वैयक्तिक ग्राहक वैयक्तिक उत्पादन वगैरेंच्या कृती विचारात घेत नाही. वैयक्तिक ग्राहकांच्या कल्याणाकडे किंवा हिताकडे दुर्लक्ष केले जात असल्याने या अर्थशास्त्राच्या उपयुक्ततेची मर्यादा पडतात.

समग्रलक्षी अर्थशास्त्र जेव्हा एखाद्या घटकाचा अभ्यास केला जातो तेव्हा असा गट निर्माण करणाऱ्या मोठ्या संख्येने असलेल्या वैयक्तिक एककाकडे दुर्लक्ष केले जाते मात्र ते धोकादायक आहे.

### 7) एकत्रित प्रवृत्तींचा सर्व क्षेत्रांवर सारखाच परिणाम नाही

एकत्रित प्रवृत्तींचा सर्व क्षेत्रांवर सारखाच परिणाम होत नाही. उदाहरणार्थ किमतीतील वाढीचा परिणाम वेगवेगळ्या क्षेत्रांवर वेगळा होतो. किमतीतील वाढीमुळे उत्पादकांना फायदा होतो आणि ग्राहकांना त्रास होतो. अशा वेगवेगळ्या निरनिराळ्या मर्यादा समग्रलक्षी अर्थशास्त्रच्या बाबतीत दिसून येतात.

## समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्टे :-

- **किंमत स्थैर्य**
- **पूर्ण रोजगार**
- **आर्थिक स्थैर्य**
- **आर्थिक वृद्धी**

### 1. किंमत स्थैर्य

हे महत्त्वाचे समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्ट आहे. किमतीतील चढ-उतार यामुळे अर्थव्यवस्थेत अनिश्चितता व स्थैर्य निर्माण होते. वाढत्या व घटत्या किमती या दोन्ही वाईट असतात. कारण त्या अनावश्यक रीतीने काहींना तोटा होण्यास व काहींना लाभ मिळण्यास मदत करतात. किमतीतील अस्थैर्य त्याचे वाईट परिणाम घडून येतात. किमतीतील मोठ्या प्रमाणावरील चढ-उतारामुळे अर्थव्यवस्थेत गंभीर स्वरूपाचे असते. त्यातून चलनवाढ व चलनघट निर्माण होते. या दोन्हींचे अर्थव्यवस्थेतील उत्पादन विभाजन वगैरेंवर अनेक दुष्परिणाम घडून येतात.

त्यामुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी किंमत स्थैर्यचे उद्दिष्ट महत्त्वाचे आहे. चक्रीय चढ-उतार दूर करणे, आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे,

उत्पन्न व संपत्तीतील विषमता दूर करणे आणि पैशाचे मूल्य स्थिर राखणे या दृष्टीने किंमत तर याचे धोरण महत्त्वाचे ठरते. मात्र किमतीचे स्थिरीकरण याचा अर्थ वैयक्तिक किमती एखाद्या विशिष्ट पातळी स्थिर करणे असा होत नाही. किंमत स्थिरीकरण करणे म्हणजे घाऊक किंमत निर्देशांक यातून स्पष्ट होणारी सरासरी किंमत पातळी स्थिर राखणे होय.

## 2) पूर्ण रोजगार

पूर्ण रोजगार साध्य करणे हे विकसित आणि विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या देशातील समग्रलक्षी आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. पूर्ण रोजगार म्हणजे अशी स्थिती की जेथे नोकरी किंवा काम करण्याची इच्छा व क्षमता असलेल्यांना नोकरी किंवा काम मिळते. मात्र काही प्रमाणात संघर्षजन्य हंगामी आणि संरचनात्मक बेकरी असू शकते. प्रामुख्याने श्रमदल आणि इतर उत्पादक स्त्रोत स्वतःच्या इच्छेविरुद्ध बेकार राहणे म्हणजे बेकारी होय. बेकारी अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पादनाची जवळून संबंधित आहे. बेकारीचा दर जास्त असेल तर वास्तविक एकूण उत्पादन आणि संभाव्य उत्पादन यामधील फरक अधिक असतो. त्यामुळेच बेकारी दूर करून पूर्ण रोजगार साध्य करणे हे समग्रलक्षी आर्थिक धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

महामंदीच्या काळात जेव्हा काही अपवाद वगळता बहुतेक सर्व देशातील बेकारीचा दर उच्च होता. तेव्हा धोरणकर्त्यांना मध्ये पूर्ण रोजगाराचे सर्वोच्च उद्दिष्ट होते. कोणत्याही सरकारची कामगिरी पूर्ण रोजगार आणि किंमत स्थैर्य ही उद्दिष्टे साध्य करण्याच्या आधारे ठरवली जातात .

## 3)आर्थिक स्थैर्य

अर्थव्यवस्थेत आर्थिक व्यवहारात होणारे चढ-उतार कमी करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे हे समग्रलक्षी आर्थिक उद्दिष्ट आहे. अर्थव्यवस्थेतील आर्थिक व्यवहारात चढ-उतार होतात तेव्हा तेजी किंवा मंदीची स्थिती निर्माण होते. त्यातून निर्माण होणाऱ्या अस्थिरतेमुळे आर्थिक विकास प्रक्रियेत अडथळा येतो. उत्पादन विभाजन आणि अनेक आर्थिक घटकांवर दुष्परिणाम होतात. मंदीच्या स्थितीत उत्पादन आणि रोजगार यात मोठ्या प्रमाणात घट होऊन आर्थिक आरिष्ट निर्माण होते. हे टाळण्यासाठी तेजी-मंदी च्या स्वरूपातील चढ-उतार कमी करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यावर समग्रलक्षी धोरणात भर दिलेला दिसून येतो. चलनविषयक व

राजकोषीय धोरण अर्थव्यवस्थेतील अस्थिरता कमी करून आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करण्यास मदत करतात.

### 4)आर्थिक वृद्धी

अलीकडील काळात अर्थव्यवस्थेची वेगाने आर्थिक वृद्धी घडून आणणे हे समग्रलक्षी आर्थिक धोरणाच्या अनेक महत्त्वाच्या उद्दिष्टंपैकी एक उद्दिष्ट समजले जाते. आर्थिक उद्दिष्ट आर्थिक वृद्धी म्हणजे अशी प्रक्रिया की ज्याद्वारे दीर्घकाळपर्यंत देशाच्या वास्तव दरडोई उत्पन्नात वाढ होते. आर्थिक वृद्धीचे मोजमाप देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांच्या परिमाणातील वाढीच्या आधारे केले जाते. जेव्हा अर्थव्यवस्थेच्या उत्पादन क्षमतेत वाढ घडून येते तेव्हा आर्थिक वृद्धी घडून येते. उत्पादन क्षमतेत वाढ वस्तू व सेवा यांचे उत्पादन करण्यासाठी वापरली जाते.

### 5) व्यवहारतोल समतोल

व्यवहार तोलातील समतोल राखणे हे समग्रलक्षी धोरणाचे आणखी एक उद्दिष्ट आहे. जागतिक व्यापारात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने हे उद्दिष्ट साध्य करणे महत्त्वाचे झाले. व्यवहारतोलातील तूट ही इतर उद्दिष्टे साध्य करण्याच्या बाबतीत अडथळा ठरते. याचे कारण व्यवहारातील त्रुटींमुळे मोठ्या प्रमाणात सोने देशाबाहेर जाते. निर्यात करत असलेल्या वस्तूंच्या समान मूल्यांच्या आसपास आयात करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असते. हे देशाला परकीय चलन मिळवण्यास आणि देशातील नागरिकांना अधिक वैविध्यपूर्ण उत्पादनांचा पुरवठा करण्यास मदत करते. देशाचे उद्दिष्ट वाढाव्याचे म्हणजेच आयातीपेक्षा निर्यात अधिक किंवा तुटीचे निर्यातीपेक्षा आयात जास्त असे नसते .
जर देशाची निर्यात आयातीपेक्षा जास्त असेल तर तो देश व्यवहार तोल वाढावा किंवा सोने व परकीय चलन यांसारख्या राखीव निधीचा संचय अनुभवतो.जेव्हा देश राखीव निधी गमावतो तेव्हा तो देश व्यवहार दोन फूट होतो मात्र राखीव निधीतील घट अर्थव्यवस्थेची समाधानकारक कामगिरी दर्शवते आणि त्यामुळे विविध समस्या निर्माण होतात. त्यामुळेच प्रत्येक देशाचे ध्येय परकीय चलन साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ करण्याचे असते.